स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY

NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade





## ACADEMIC (Affiliation) SECTION

Phone: (02462) 229242 / 43
Fax : (02462) 229245 / 229325

Website: www.srtmun.ac.

E-Mail ID: affi.srtmun@gmail.com


संदर्भ:– १. शासन निर्णय क्र. मभापं–२०१५/प्र.क्र.७०/भाषा–२ दि. १९/०९/२०१५.
२. शिक्षण संचालनालयाचे पत्र क. उशिसं/२०१५/मभापं/मवि–१/९९९५ दि. ०८/१०/२०१५.
३. जा. क. विशिसस/उशि/नांवि/२०१५–१६/अनु–२/७३४९–५१ दि. २१/११/२०१५.

## ::परिपत्रक::

मा. सर्व संचालक शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर व प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये प्रस्तुत विद्यापीठ यांना सदर परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, संदर्भीय पत्राव्दारे संदर्भ पत्र क्र. १ नुसार शासन निर्णयान्वये दि ०१ मे ते १५ मे हा कालावधी लक्षात घेवून शैक्षणिक संस्थांना या कार्यक्रमात सहभागी होता यावे या उद्देशाने सदर पंधरवडा हा दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी करण्यात आलेला आहे. तेव्हा विद्यापठाशी संलग्नित सर्व शैक्षणिक संस्थामध्ये दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी **"मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा"** म्हणुन साजरा करण्यात यावा असे नमुद केले आहे. तसेच संदर्भ पत्र क्र. ३नुसार मा. सहसंचालक,उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांनी दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी **"मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा"** म्हणून साजरा करण्याबाबत कळविले आहे. (सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.).

**"मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा"** म्हणून साजरा करण्याकरिता शासनाने खालील विविध कार्यक्रम आयोजित करण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे.

१. महाराष्ट्रातील अमराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रसार व प्रचार होवुन ही भाषा त्यांच्या मुखी आणि लेखी रुळावी यासाठी शिबीर त्याचबरोबर वक्तृत्व, लेखन स्पर्धा यांचे आयोजन करणे.
२. शासन व्यवहारात मराठीचा वापर या विषयावर परिसंवाद, कार्यशाळा, राज्यस्तरीय वक्तृत्व, निबंध स्पर्धा यांचे आयोजन करणे.
३. मराठी वाचन संस्कृती वाढविण्यासाठी मराठीतील अभिजात ग्रथांना परिचय करुन देणारी तज्ञ व्यक्तींची व्याख्याने, ग्रंथप्रदर्शन, मराठी चित्रपट, इतिहास यांचा परिचय करुन देणारी ग्रथप्रदशने यांचे अयोजन करावे.
४. लोककला, संगीत, भारुड, गवळण, कथाकथन, काव्यवाचन या विषयी कार्यक्रम,स्पर्धा यांचे आयोजन करणे.

तरी आपल्या महाविद्यालयामध्ये उपरोक्त कार्यक्रम आयोजित करुन **"मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा"** म्हणुन साजरा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा कार्यअहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा.

''ज्ञान तीर्थ'' परीसर )(
विष्णुपुरी, नांदेड )(
जा. क्र.शैक्षणिक–३/२०१५–२०१६/1948 )(
दिनांक :१४/१२/२०१५ )(
15 )(

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहीतीस्तव :

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.
२. मा. प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. संचालक उच्च शिक्षण,शिक्षण संचालनालय, पुणे.
४. मा. सह संचालक उच्च शिक्षण नांदेड विभाग, नांदेड.
५. सिस्टीम एक्सपर्ट, युजीसी कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना विद्यापीठ वेबसाईटवर उपलब्ध करण्यासाठी.

आ. क्र. 3304 दिनांक 28/10/15
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
स्वा रा ती म... विद्यापीठ, नांदेड.

महाराष्ट्र शासन

# कार्यालय, विभागीय शिक्षण सहसंचालक,

## (उच्च शिक्षण),नांदेड विभाग, नांदेड

(शासकीय तंत्रनिकेतन परिसर, नांदेड-४३१६०२, फोन/फॅक्स ०२४६२-२५३१४४), ईमेल पत्ता: jdhe.nanded@yahoo.co.in

5500 27/10/15

जा.क्र. विशिससं/उशि/नांवि/२०१५-१६/अनु-२/ 7349-51 दि.21/10/२०१५.

कार्यालयाच्या संकेतस्थळावरुन / ईमेलव्दारे/परिपत्रक /

प्रति,
सर्व प्राचार्य
शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालय,
नांदेड विभाग, नांदेड.

**विषय :-** **दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीती मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.मभापं-२०१५/प्र.क्र.७०/भाषा-२ दिनांक १९/०९/२०१५
२. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/२०१५/मभापं/मवि-१/९९९५ दिनांक ०८/१०/२०१५

वरील विषयाच्या संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राजभाषा अधिनियम,१९६४ नुसार मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून स्वाकारण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने राज्यामध्ये त्रिभाषा सुत्राचा वापर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. भाषा हे अभिव्यक्तीचे माध्यम असल्यामुळे तिचा प्रचार व प्रसार सर्व माध्यमातून होणे आवश्यक आहे. शासनाने दि. १२.०४.२०१३ च्या शासन निर्णयान्वये दि. ०१ मे ते १५ मे हा कालावधी लक्षात घेवून शैक्षणिक संस्थांना या कार्यक्रमात सहभागी होता यावे या उद्देशाने सदर पंधरवडा हा दि. ०१ जानेवारी ते १५ जानेवारी करण्यात आलेला आहे. याबाबतचा शासन निर्णय दि. २२ जुलै् २०१५ निर्गमित करण्यात आलेला आहे.

" मराठी भाषा संवर्धन पंधरवडा " साजरा करण्याकरिता शासनाने खालील विविध कार्यक्रम आयोजित करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

१. महाराष्ट्रतील अमराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रसार व प्रचार होऊन ही भाषा त्यांच्या मुखी आणि लेखी रुळावी यासाठी शिबीर त्याचबरोबर वक्तृत्व, लेखन स्पर्धा यांचे आयोजन करणे.
२. शासन व्यवहारात मराठीचा वापर या विषयावर परिसंवाद, कार्यशाळा, राज्यस्तरीय वक्तृत्व, निबंध स्पर्धा यांचे आयोजन करणे.
३. मराठी वाचन संस्कृती वाढविण्यासाठी मराठीतील अभिजात ग्रंथाचा परिचय करुन देणारी तज्ञ व्यक्तींची व्याख्याने, ग्रंथप्रदर्शन,मराठी चित्रपट इतिहास यांचा परिचर करुन देणारी ग्रंथप्रदर्शने यांचे आयोजन करावे.
४. लोककला,संगीत,भारुड,गवळण,कथाकथन,काव्यवाचन या विषयी कार्यक्रम,स्पर्धा यांचे आयोजन करणे.

तरी आपल्या महाविद्यालयामध्ये उपरोक्त कार्यक्रम आयोजित करुन **" मराठी भाषा संवर्धन पंधरवडा "** साजरा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सोबत : शासन निर्णय व पत्र दिनांक १९.०९.२०१५**

(डॉ.एम.एन. खताळ)
सहसंचालक
उच्च शिक्षण, नांदेड विभाग,
नांदेड.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर : -**

१) मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण ), शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे-१. यांना माहितीस्तव सादर.
२) कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना देऊन कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखाली येणाऱ्या अशासकीय कायम विनाअनुदानीत महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

S p.drive /Paripatrak

D1 School of Lang Lit. & Cul Studies